# इलेक्ट्रीक वाहन रॅलीतून केली जनजागृती; आर्थिक बचत व पर्यावरण संवर्धनासाठी अपारंपारिक ऊर्जा वापरास चालना द्यावी- अपारंपारिक ऊर्जा मंत्री सावे







**छत्रपती संभाजीनगर (अट्टल मत प्रतिनिधी)**

देशाच्या ऊर्जानिर्मितीतील अधिक भाग हा कोळसा आणि पेट्रोलियम इंधनांवर खर्च होतो. हे इंधन आयात करावे लागत असल्याने देशाची परकीय चलनाची गंगाजळीतील मोठा हिस्सा खर्च करावा लागतो. ही बचत करण्यासाठी सौर ऊर्जा व अपारंपारिक ऊर्जेचे अन्य पर्यायांचा वापर करण्यास चालना देण्याचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे धोरण आहे. त्यास चालना देण्यासाठी नागरिकांनी पर्यायी ऊर्जास्रोतांचा वापर करावा,असे आवाहन अपारंपारिक ऊर्जा मंत्री अतुल सावे यांनी आज येथे केले.

महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरण (चएऊअ) आणि ऊर्जा दक्षता ब्युरो (इएए) यांच्या संयुक्त विद्यमाने इलेक्ट्रिक वाहन रॅलीचे आयोजन करण्यात आले. टीव्ही सेंटर मैदानापासून या रॅलीस प्रारंभ झाला. महाऊर्जाचे विभागीय महाव्यवस्थापक विनोद सिरसाट, अपर जिल्हाधिकारी प्रवीण फुलारी, उपवनसंरक्षक प्रमोद लाकरा, महावितरणचे मुख्य अभियंता पवनकुमार कछोट, महेंद्र ढवले, प्रकाश पेटवडेकर, किशन धोत्रे आदी उपस्थित होते. श्री. सावे म्हणाले की, ऊर्जेची बचत करणे म्हणजेच ऊर्जेचे उत्पादन करणे होय. मोठ्या प्रमाणावर आपल्या देशाला इंधन आयात करावे लागते. त्यामुळे पर्यायी ऊर्जेचा वापर करुन ऊर्जेच्या बाबतीत स्वयंपूर्ण होणे हे आपले धोरण आहे. त्यानुसार मुख्यमंत्री फडणवीस यांनी आता लोकप्रतिनिधींनाही इलेक्ट्रीक वाहने वापरण्यास सांगितले आहे. अशाप्रकारे आयात इंधन वापरास पर्याय उपलब्ध करुन आपण परकीय चलनाचीही बचत करु शकतो,असे सावे यांनी सांगितले. त्यांनी सांगितले की. छत्रपती संभाजीनगर हे क्षेत्र इलेक्ट्रीक वाहनांच्या निर्मितीत अग्रेसर आहे. देशातील अग्रगण्य उद्योजक या ठिकाणी इलेक्ट्रीक वाहन निर्मितीचे उद्योग उभारत आहेत, ही आपल्यासाठी अभिमानास्पद बाब आहे.

प्रास्ताविक विनोद शिरसाट यांनी केले. श्री. सावे यांच्या हस्ते झेंडी दाखवून रॅली रवाना करण्यात आली. या रॅलीत मोटार सायकल, तीन चाकी रिक्षा, मालवाहू वाहने,हातगाडी, बसेस, कार अशा विविध ३५० हून अधिक ईलेक्ट्रिक वाहनांनी सहभाग घेतला. क्रांती चौकात रॅलीचा समारोप झाला.

# धरती के लाल न कर इतना मलाल

**(आनंद बक्षी स्मृतिदिन विशेष.)**

कविता हा त्यांचा जीव की प्राण. त्यांचे विश्वच निराळे. शब्दांच्या मळ्यात फिरणारे. हा शब्दप्रभू कवितेच्या मळ्यात खुशाल बागडायचा. अंगच्या प्रतिभेने रुपेरी पडद्याच्या दालनात त्याने प्रवेश केला. त्याने रसिकांना जिंकले. कारण त्याच्या शब्दांची जादूच तशी होती. त्याच्या लेखणीतून उतरलेल्या गीतांनी तरुणाईला झिंग आणली. आनंद बक्षी नावाच्या या गीतकाराबद्दल महत्वपूर्ण संकलित माहिती श्री कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरुजी प्रस्तुत करताहेत.... संपादक

कलाकार बनण्याचे स्वप्न उरी बाळगणारा हा रांगडा गडी नेहमी म्हणायचा, जीवनात यशस्वी व्हायचे असेल तर ध्येय हवे. आपण गायक व्हायचे, असे आनंद बक्षींच्या मनात खूप होते. मात्र त्यांच्यातील कविमनाने गायकीवर मात केली. ते गीतकार बनले आणि जन्माला आली तुमचे -आमचे जीवन फुलवणारी, अविस्मरणीय गाणी. शब्दांच्या या जादूगाराने आपल्या गीतांनी रसिकांना जणू मोहिनीच घातली. प्रेमाची ओढ असो की विरह, आई-मुलातील वात्सल्य असो की मरणाची अपरिहार्यता असो, आनंद बक्षींच्या लेखणीने या सर्व भावना रसिकांच्या मनी ठसायच्या.

सन १९५८मध्ये आलेला 'भला आदमी' हा गीतकार आनंद बक्षींचा पहिला चित्रपट. 'धरती के लाल न कर इतना मलाल' हे त्यांचे पहिले गाणे. आनंद बक्षी प्रकाशझोतात आले ते 'जब जब फूल खिले'च्या गीतांमुळे. या चित्रपटात त्यांची लेखणी अशी खुलली की तिने रसिकांची मने काबीज केली. 'ये समा, समा है ये प्यार का' हे यातले लताच्या आवाजातले गाणे आजही ताजे, टवटवीत वाटते. सहज ओठांवर येतील असे साधे, आशयघन शब्द, मनाला भावणा-या शब्दांची यमकालंकारात केलेली सहज-सोपी गुंफण ही आनंद बक्षींच्या गाण्यांची वैशिष्ट्ये.

रसिकांच्या मनातले भाव नेमकेपणाने त्यांच्या गीतांत उतरायचे. मैत्री असो की द्वेष, प्रेम असो की मत्सर, वासल्य असो की कारुण्य, जीवनाचे तत्त्वज्ञान असो की फँटसी, आनंद बक्षींची लेखणी हे सारे भावविश्व चपखलपणे टिपायची. या सर्व भावना मग सुंदर गीतातून रसिकांच्या मनात रुंजी घालायच्या. आदमी मुसाफिर है, आता है जाता है - अपनापन मधून जीवनचक्रावर भाष्य करणारे बक्षी, इश्क बिना क्या जीना यारो- ताल हा भावही तरलपणे मांडतात. कोरा कागज था ये मन मेरा- आराधना अशी प्रांजळ कबुली देत आनंद बक्षी प्रेमाची ग्वाही देतात, तिला पाहताच दर्दे दिल दर्दे जिगर, दिल में जगाया आपने- कर्ज अशी स्पष्ट कबुली देतात. पुढच्याच पावलावर मैं शायर तो नहीं-बॉबी असे सांगत तिच्या प्रभावाचे वलय स्पष्ट करतात. शीशा हो या दिल- आशा मधून ते पुढील धोक्याची जाणीवही करून देतात.

प्रेमाचा बहर संपल्यानंतरचा नैराश्य, वैफल्याचा भाव व्यक्त करताना आनंद बक्षींच्या लेखणीला जणू आगळी धारच चढते. त्यांच्या ४० गाण्यांना फिल्मफेअरमध्ये नामांकन मिळाले. चार वेळा त्यांना फिल्मफेअर पुरस्कार मिळाला. आपल्या सिद्धहस्त लेखणीने रसिकांच्या जीवनात मधुर आनंद पसरवणाऱ्या आनंद बक्षी यांना मनापासून सलाम! आनंद बक्षी हे एक हिंदी गीतकार व कवी होते. त्यांचा जन्म दि.२१ जुलै १९३० रोजी आताच्या पाकिस्तानमधील रावळिपंडी येथे काश्मीरी मोहयाल ब्राह्मण कुटुंबात झाला. त्यांची आई सुमित्रा आनंद बक्षी ते पाच वर्षांचे असतानाच वारली. त्यांचे कुटुंब भारताच्या फाळणी दरम्यान २ ऑक्टोबर १९४७ रोजी भारतात आले. डकोटा विमानातून दिल्लीला आल्यावर बक्षी कुटुंब पुणे, मेरठ आणि शेवटी परत दिल्लीत येऊन स्थायिक झाले. कविता हा ज्यांचा जीव की प्राण. त्यांचे विश्वच निराळे. शब्दांच्या मळ्यात फिरणारे. त्यात त्यांच्या वाट्याला आली लष्करातली नोकरी. लष्कराच्या कडक शिस्तीत शब्दांना अधिकच साचेबद्धता आली. ते रुक्ष वातावरण, तो युद्धाचा सराव, लष्करी कवायत अशा वातावरणात हा शब्दप्रभू कवितेच्या मळ्यात खुशाल बागडायचा. अंगच्या प्रतिभेने रुपेरी पडद्याच्या दालनात त्यांनी प्रवेश केला. त्यांनी रसिकांना जिंकले.



कारण त्यांच्या शब्दांची जादूच तशी होती. त्यांच्या लेखणीतून उतरलेल्या गीतांनी तरुणाईला झिंग आणली. गायक व्हायचे आनंद बक्षींच्या मनात खूप होते. मात्र, त्यांच्यातील कविमनाने गायकीवर मात केली. ते गीतकार बनले आणि जन्माला आली तुमचे-आमचे जीवन फुलवणारी, अविस्मरणीय गाणी. शब्दांच्या या जादुगाराने आपल्या गीतांनी रसिकांना जणू मोहिनीच घातली. प्रेमाची ओढ असो की विरह, आई-मुलातील वात्सल्य असो की मरणाची अपरिहार्यता असो, आनंद बक्षींच्या लेखणीने या सर्व भावना रसिकांच्या मनी ठसायच्या. सन १९५८मध्ये आलेला 'भला आदमी' हा गीतकार आनंद बक्षींचा पहिला चित्रपट. 'धरती के लाल न कर इतना मलाल' हे त्यांचे पहिले गाणे. आनंद बक्षी प्रकाशझोतात आले ते 'जब जब फूल खिले'च्या गीतांमुळे. या चित्रपटात त्यांची लेखणी अशी खुलली की तिने रसिकांची मने काबीज केली. 'ये समा, समा है ये प्यार का' हे यातले लताच्या आवाजातले गाणे आजही ताजे, टवटवीत वाटते. सहज ओठांवर येतील असे साधे, आशयघन शब्द, मनाला भावणाऱ्या शब्दांची यमकालंकारात केलेली सहज-सोपी गुंफण ही आनंद बक्षींच्या गाण्यांची वैशिष्ट्ये. रसिकांच्या मनातले भाव नेमकेपणाने त्यांच्या गीतांत उतरायचे. मैत्री असो की द्वेष, प्रेम असो की मत्सर, वासल्य असो की कारुण्य, जीवनाचे तत्त्वज्ञान असो की फँटसी, आनंद बक्षींची लेखणी हे सारे भावविश्व चपखलपणे टिपायची. या सर्व भावना मग सुंदर गीतातून रसिकांच्या मनात रुंजी घालायच्या. संगीतकार लक्ष्मीकांत-प्यारेलाल यांच्याबरोबर आनंद बक्षी यांचे सूर जुळले. या त्रयीने अनेक अविस्मरणीय गाणी दिली आहेत. आने से उसके आये बहार-जीने की राह, बिंदिया चमकेगी-दो रास्ते, सावन का महीना-मिलन, मैं शायर तो नहीं-बॉबी, परदा है परदा-अमर अकबर अँथोनी, आदमी मुसाफिर है-अपनापन, डफलीवाले-सरगम, ओम शांती ओम-कर्ज ही आनंद बक्षी-लक्ष्मी-प्यारे या त्रयींची काही सुपरहिट गाणी. लक्ष्मी-प्यारे यांच्याप्रमाणेच राहुलदेव बर्मन-आरडी यांच्याबरोबरही आनंद बक्षी यांचे सूर जुळले. ना कोई उमंग है-कटी पतंग, रैना बीती जाए-अमर प्रेम, महेबूबा महेबूबा-शोले, परबत के पीछे-महेबूबा, सावन के झूले पडे-जुर्माना, दम मारो दम-हरे राम ही आरडी-आनंद बक्षी यांची काही गाजलेली गाणी आहेत. कल्याणजी-आनंदजी, अनु मलिक, राजेश रोशन या संगीतकारांसाठीही आनंद बक्षी यांनी अनेक अविस्मरणीय गाणी दिली आहेत. अशा या महान गीतकाराचे दि.३० मार्च २००२ रोजी निधन झाले. त्यांना आज पुण्यस्मरण दिन सप्ताहांत मनापासून सलाम !!

– संकलन व शब्दांकन –
**श्री कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरुजी.**

## भारतीय सैन्य भरती रॅली; ऑनलाईन नोंदणीची सुविधा

**छत्रपती संभाजीनगर (अट्टल मत प्रतिनिधी)**

भारतीय सैन्य दलातील भरतीसाठी अधिसूचना अप्रकाशित करण्यात आली असून ऑनलाईन नोंदणी करण्याची सुविधा सैन्य दलाच्या वेबसाइट www.joinindianarmy.nic.in वर उपलब्ध करण्यात आली आहे.

भरती प्रक्रियेविषयी सविस्तर माहिती याप्रमाणे- ऑनलाइन सामान्य प्रवेश परीक्षा (CEE): सर्व उमेदवारांसाठी नामांकित केंद्रांवर उएए परीक्षा होईल. अग्निवीर लिपिक/SKT श्रेणीसाठी टायपिंग चाचणी देखील घेतली जाईल. CEE उत्तीर्ण उमेदवारांसाठी भरती रॅलीदरम्यान शारीरिक चाचणी आणि मापन चाचणी होईल.ॲडाप्टेबिलीटी चाचणीसाठी उमेदवारांनी उमेदवारांनी यापूर्वीच कार्यरत असलेला स्मार्ट फोन, पुरेशी बॅटरी आणि २ऋइ डेटा सोबत आणणे आवश्यक आहे. या परीक्षेसाठी दि.१० एप्रिल पर्यंत ऑनलाईन नोंदणी करता येणार आहे.

अग्निवीर उमेदवारांसाठी विशेष सुविधा: उमेदवार त्याच्या पात्रतेनुसार कोणत्याही दोन श्रेणींसाठी अर्ज करू शकतो.

दोन पर्याय निवडणाऱ्या उमेदवारांना दोन्ही गटांसाठी वेगवेगळे अर्ज भरावे लागतील व प्रत्येक श्रेणीसाठी वेगळी उएए परीक्षा द्यावी लागेल.मात्र, फक्त एकदाच भरती रॅली व वैद्यकीय चाचणी द्यावी लागेल.

क्रीडा खेळाडू, NCC प्रमाणपत्रधारक, ITI प्रशिक्षित आणि डिप्लोमा धारकांना विशेष गुण मिळतील. नोंदणी व परीक्षा प्रक्रियेबद्दल व्हिडिओ आणि सराव मॉक टेस्ट भारतीय सैन्याच्या अधिकृत वेबसाइटवर उपलब्ध आहेत. www.joinindianarmy.nic.in

हे साप्ताहिक मालक, मुद्रक , प्रकाशक व संपादक - श्री. रशपालसिंघ एन.अट्टल यांनी मानसी प्रिंटर्स, प्लॉट नं. ४५, सर्व्हिस इंडस्ट्री सेक्टर सिडको, औरंगाबाद ४३१००५ (महा.) येथे छापून कार्यालय : शॉप नं. ३, केशरदिप कॉम्प्लेक्स, एन- ७ पोलीस स्टेशन जवळ, सिडको , औरंगाबाद ४३१००३, (महा.) येथे प्रसिध्द केले. या अंकातील मजकुराशी संपादक जबाबदार राहतीलच असे नाही ( यासंबंधी कोणताही वाद औरंगाबाद न्यायालयात राहील.) मो. ७५८८१६६४९६, ९६२३४८४४८४. email : attalmat@gmail.com.